Trust Registration Number- F-3967 Bombay

Maharashtra Judo Association

Affiliated to Judo Federation of India and Maharashtra Olympic Association

महाराष्ट्र ज्युदो असोसिएशन

Adv. Dhananjay S. Bhonsale
President
523/63 B, "Shivneri",
Opp. ZP, Sadar Bazar, Satara 415 001
02162-234600; 94220 38778
bhonsaleds@gmail.com

Datta Aphale
General Secretary
Flat No 401, Wing 'O', Pethkar Samrajya
Paud Road, Kothrud, Pune 411 038
Ph. 90499 98765; 94231 50231
aphaledm@gmail.com

08 ऑगस्ट 2018, पुणे

भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!

**प्रति,**
**मा. सचिव**
**जिल्हा ज्युदो संघटना**

**विषय: 46 वी सबज्युनियर्स राज्य ज्युदो स्पर्धा आणि राष्ट्रीय निवड चाचणी स्पर्धा-2018-बीड**

महोदय / महोदया,

कळविण्यास आनंद होतो की, महाराष्ट्र ज्युदो संघटनेनी सबज्युनियर्स गटाच्या राज्य स्पर्धा तसेच राष्ट्रीय निवड चाचणी स्पर्धा, बीड येथे 'बीड जिल्हा ज्युदो संघटना' यांच्या सहकार्याने आयोजित केल्या आहेत. सबज्युनियर्स गटाच्या राष्ट्रीय स्पर्धा दिनांक 07 सप्टेंबर ते 11 सप्टेंबर 2018 दरम्यान उना, हिमाचल प्रदेश येथे ज्युदो फेडरेशन ऑफ इंडिया आयोजित करत आहे. स्पर्धेचा तपशील खालीलप्रमाणे ;

1) **कालावधी**: दिनांक 25-26-27 ऑगस्ट 2018

2) **ठिकाण**: श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल, बीड

3) **वेळापत्रक**: (1) दिनांक 25 ऑगस्ट 2018 - खेळाडुंचे दुपारी 1.00 वाजेपर्यंत आगमन, त्यानंतर वयाचे दाखले तपासणे, वजने घेणे. संध्या. 6 वाजता व्यवस्थापक मीटिंग, लॉटस टाकणे, स्पर्धा प्रारंभ
(2) दि. 26 व 27 ऑगस्ट 2018- स्पर्धा- सकाळी 8 ते स्पर्धा वेळापत्रक संपेपर्यंत.

4) **एंट्री फॉर्म** सोबत जोडलेला असून तो व्यवस्थित टाईप करून दिनांक 21.08.2018 पर्यन्त श्री दत्ता आफळे - aphaledm@gmail.com आणि श्री शैलेश टिळक stilak@yahoo.com यांच्याकडे पाठवावा. उशिरा एंट्री पाठवल्यास अथवा पाठवलेल्या एंट्रीमध्येनंतर बदल केल्यास रुपये 1,000/- दंड आकारला जाईल. फॉर्मवर अध्यक्ष अथवा सचिव यांचीच स्वाक्षरी असायला हवी. हा फॉर्म अधिकृत संघ व्यवस्थापकांबरोबर स्पर्धेठिकाणी द्यावा. प्रवेशिकांमधे दिल्या गेलेल्या वजनगटामध्येच खेळाडूला खेळावे लागेल.

5) **प्रवेश शुल्क**: रुपये 300/- प्रत्येकी; निमंत्रित संघ - रुपये 3,000/-

(निमंत्रित संघांसाठी प्रवेश शुल्काव्यतिरिक्त वर्षातील तीनही स्पर्धांचे एकत्रित शुल्क सबज्युनियर्स स्पर्धांवेळी जमा करण्याबाबतच्या सातारा येथील 23.07.2017 रोजी आयोजित वार्षिक सर्वसाधारण बैठकीमधील एकमताच्या ठरावाप्रमाणे, सर्व निमंत्रित संघांना सबज्युनियर्स, कॅडेट-ज्युनियर्स तसेच सिनियर्स स्पर्धांचे वार्षिक एकत्रित शुल्क रुपये 3000/- बीड येथेच भरावे लागेल.)

**6**)**भोजन खर्च**: रु. 500/- प्रत्येकी. (दि. 25 ते 27 ऑगस्ट 2018- एकूण 2 नाश्ता, 5 भोजन);
रहाण्याची सोय दि. 25 ऑगस्टच्या रात्रीपासून ते 27 ऑगस्ट 2018 रात्रीपर्यंत केलेली आहे.
**मुलींच्या रहाण्याची व्यवस्था** - श्री छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा संकुल, बीड
**मुलांच्या रहाण्याची व्यवस्था** - रविराज मंगल कार्यालय, हिवरेकर गिरणी, मोंढा रोड, बीड
**7**) प्रत्येक संघास वर्तणूक हमी म्हणून रु 1,000/- ठेवरूपात भरावे लागतील.
**8**) सर्व संघांनी दिनांक 25 ऑगस्ट 2018 रोजी किमान दुपारी 1.00 वाजेपर्यंत पोहचावे.
**9**) एका वजनगटात प्रत्येक जिल्हा संघाच्या मुले आणि मुली यांच्या प्रत्येक गटामधे एका खेळाडूस भाग घेता येईल
**10**) स्पर्धा जेएफआयच्या प्रचलित नवीनतम नियमांप्रमाणे घेण्यात येतील.
महाराष्ट्रातील नवोदित खेळाडूंना अधिक संख्येनी भाग घेता यावा यासाठी महाराष्ट्र ज्युदो संघटनेनी राष्ट्रीय स्पर्धेमधील वजनगटांव्यतिरिक्त अधिकचे वजनगट राज्य स्पर्धेसाठी ठेवले आहेत, मात्र फेडरेशनच्या नियमाप्रमाणे 30 वजनगटांमधे राष्ट्रीय स्पर्धेसाठी महाराष्ट्र-'ब' संघामध्ये विजेते खेळाडू पाठवले जातील. ज्या ठिकाणी मुंबई संघाचा खेळाडू विजेता असेल त्या वजनगटाच्या राष्ट्रीय स्पर्धेच्या निवड स्पर्धा रौप्य आणि कांस्य विजेत्यामधून स्पर्धास्थानी लगेचच घेऊन संघाचा खेळाडू निवडला जाईल.
**11**) **वय / वजनगट**: जन्मतारखेची मर्यादा - 10 वर्षे पूर्ण - 15 वर्ष आणि खाली.
(कॅलेंडर वर्ष 2008-2007-2006-2005 आणि 2004 जानेवारी ते डिसेंबर मध्ये जन्मलेले)

खेळाडू त्यांच्या संबंधित वजनगटामध्येच खेळू शकतील. जन्मतारखेच्या दाखल्यासंदर्भात जेएफआयच्या नियमाप्रमाणे खालील तीन मूळ अधिकृत प्रतिमधे वयाचा दाखला आणणे गरजेचे आहे. याशिवाय खेळाडूला खेळण्यास परवानगी मिळणार नाही.

**अ)** महानगरपालिका / पंचायत समिती अथवा समरूप शासकीय अधिकृत व्यक्तिद्वारा जारी वयाचा दाखला / विभागातील सक्षम मुख्य वैद्यकीय अधिकारी यांनी लेटरहेडवर सहीशिक्यांनीशी जारी केलेला दाखला,

**ब)** मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी लेटरहेडवर सहीशिक्यांनीशी जारी केलेले प्रमाणपत्र

यामधे जन्मतारीख, वडिलांचे नाव, विद्यार्थ्याचा शिकत असलेला वर्ग, पत्ता, टेलिफोन क्रमांक, आणि शाळेचा फॅक्स आणि दूरध्वनी क्रमांक लिहिलेला असायला हवा. ही माहिती विद्यार्थ्याच्या पासपोर्ट आकाराच्या फोटोवर रबरी शिक्का आणि मुख्याध्यापक / प्राचार्य यांच्या स्वाक्षरीसह साक्षांकीत (अटेस्टेड) केलेले हवे.

**क)** भारत सरकारतर्फे जारी केलेल्या आधार कार्डाची मूळ प्रत

हे तीनही दाखले अनिवार्य असून याशिवाय खेळाडूस खेळू दिले जाणार नाही.

(दाखल्याच्या प्रमाणासाठी जेएफआयचे स्पर्धेसंदर्भातील मूळ इंग्रजी परिपत्रक ग्राहय धरले जाईल. खेळाडुंचे वय हे कॅलेंडर वर्षाप्रमाणे जानेवारी ते डिसेंबर असे गृहीत धरले जाईल.)

**<u>वयगट- 1</u>**

| **खेळाडूचे जन्मसाल** | **मुले** | मुली |
|---|---|---|
| **सबज्युनियर मुले**<br><br>**जन्मसाल-**<br>**2008 आणि 2007** | 20 किलोवर आणि 25 किलो आणि खाली<br>25 किलोवर आणि 30 किलो आणि खाली<br>30 किलोवर आणि 35 किलो आणि खाली<br>35 किलोवर आणि 40 किलो आणि खाली<br>40 किलोवर आणि 45 किलो आणि खाली<br>45 किलोवर | 20 किलोवर आणि 24 किलो आणि खाली<br>24 किलोवर आणि 28 किलो आणि खाली<br>28 किलोवर आणि 32 किलो आणि खाली<br>32 किलोवर आणि 36 किलो आणि खाली<br>36 किलोवर आणि 40 किलो आणि खाली<br>40 किलोवर |

**<u>वयगट- 2</u>**

| **खेळाडूचे जन्मसाल** | **मुले** | मुली |
|---|---|---|
| **सबज्युनियर मुले**<br><br>**जन्मसाल-**<br>**2006 आणि 2005** | 25 किलोवर आणि 30 किलो आणि खाली<br>30 किलोवर आणि 35 किलो आणि खाली<br>35 किलोवर आणि 40 किलो आणि खाली<br>40 किलोवर आणि 45 किलो आणि खाली<br>45 किलोवर आणि 50 किलो आणि खाली<br>50 किलोवर | 24 किलोवर आणि 28 किलो आणि खाली<br>28 किलोवर आणि 32 किलो आणि खाली<br>32 किलोवर आणि 36 किलो आणि खाली<br>36 किलोवर आणि 40 किलो आणि खाली<br>40 किलोवर आणि 44 किलो आणि खाली<br>44 किलोवर |

**<u>वयगट- 3</u>**

| **खेळाडूचे जन्मसाल** | **मुले** | मुली |
|---|---|---|
| **सबज्युनियर मुले**<br><br>**जन्मसाल-**<br>**2004** | 40 किलोवर आणि 45 किलो आणि खाली<br>45 किलोवर आणि 50 किलो आणि खाली<br>50 किलोवर आणि 55 किलो आणि खाली<br>55 किलोवर आणि 60 किलो आणि खाली<br>60 किलोवर आणि 66 किलो आणि खाली<br>66 किलोवर | 36 किलोवर आणि 40 किलो आणि खाली<br>40 किलोवर आणि 44 किलो आणि खाली<br>44 किलोवर आणि 48 किलो आणि खाली<br>48 किलोवर आणि 52 किलो आणि खाली<br>52 किलोवर आणि 57 किलो आणि खाली<br>57 किलोवर |

### वय सत्यापन चांचणी (Age verification Test -AVT)

यावर्षीपासून फेडरेशनने वयाच्या सत्यापनाविषयी चाचणी करण्याची प्रक्रिया अनिवार्य केलेली आहे. या चाचणीशिवाय राष्ट्रीय स्पर्धेमध्ये खेळू दिले जाणार नाही. आपल्याकडे असलेला कालावधी लक्षात घेता आपण राज्यस्पर्धेसाठी ही चाचणी अनिवार्य करणार नाही मात्र राष्ट्रीय स्पर्धेसाठी निवडल्या गेलेल्या खेळाडूंनी ही चाचणी करणे **<u>अत्यावश्यक</u>** आहे. त्यामुळे, राज्याच्या संघामध्ये जे खेळाडू निवडले जातील त्या खेळाडूंनी बीड येथील स्पर्धा संपल्यावर लगेचच ही चाचणी त्यांच्या गावी करावी अन्यथा त्यांना राष्ट्रीय स्पर्धेमध्ये खेळू दिले जाणार नाही.

**कशी आहे ही चाचणी**?

वय सत्यापन चाचणी म्हणजे डिजिटल एक्सरे टी डब्ल्यु टेस्ट. ही चाचणी अधिकृत हॉस्पिटलमधेच केली जावी. यासाठी खालील माहिती नीट वाचावी;

**AVT** लिंक **https://form.jotform.me/sportingethos/avp-jfi-march2018** यावर क्लिक करावे आणि आलेल्या फॉर्ममध्ये खालील माहिती काळजीपूर्वक भरावी;

- डाव्या हाताचा एक्सरे (पंजा आणि मनगट / फोरआर्मची खालील बाजू) 300 **dpi** सह डायकॉम फॉरमॅटमध्ये असलेल्या स्थितीतील एक्सरे काढावा.
- खेळाडूचे नाव, आधार कार्ड क्रमांक, जन्मतारीख याची एक्सरे मध्ये नोंद असायला हवी.
- एक्सरेची सॉफ्टकॉपी डायकॉम फॉरमॅटमधेच हवी जेणेकरून ही कॉपी ईमेलद्वारे पाठवता येईल.
- खेळाडूची ऊंची आणि वजन वरील लिंकद्वारे डाउनलोड केलेल्या फॉर्ममध्ये लिहावे/भरावे.
- जन्मतारखेचा दाखला आणि आधार कार्डाची प्रत / इतर दाखला फॉर्मसोबत जोडावा
- (वरील चाचणीची मूळ माहिती फेडरेशनच्या परिपत्रकामद्धे इंग्रजीमध्ये दिलेली आहे, ती पहावी)




⇦ खेळाडूचे नाव, आधारकार्ड क्रमांक येथे द्यावा

⇦ जन्मतारीख

12) **राष्ट्रीय स्पर्धेचा खर्च**; महाराष्ट्र ब संघाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या खेळाडूना उना येथील राष्ट्रीय स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क, नोंदणी, भोजन खर्च आणि इतर खर्च यासाठी अंदाजे रु **800**/- खर्च लागणार असल्याने ही रक्कम लगेचच राज्य संघटनेकडे भरावे लागेल याची नोंद घ्यावी. हे शुल्क फेडरेशनच्या उपरोल्लिखित परिपत्रकामधे लिहिलेले असतात. निवड झालेल्या संघाच्या उना येथे येण्या - जाण्या संदर्भातील सूचना 27 ऑगस्ट रोजी स्पर्धा संपल्यावर दिल्या जातील.

आजपर्यंतचा अनुभव असा आहे की, निवडल्या गेलेल्या खेळाडूंपैकी काही खेळाडू राज्याच्या संघास एकत्रित सूचना देताना नसतात, तेंव्हा संबंधित जिल्हा सचिवांनी खेळाडू अनुपस्थित राहू नयेत याची काळजी घ्यावी आणि या मिटिंगसाठी खेळाडू उपस्थित रहातील याच्या सूचना द्याव्यात.

फेडरेशननी कळविल्याप्रमाणे राष्ट्रीय स्पर्धेच्या सहभागासाठी निर्धारित ज्युदोगी घालूनच खेळावे लागेल. यासाठी अशा ज्युदोगीची उपलब्धता करणे ही जबाबदारी राज्य संघामध्ये निवडल्या गेलेल्या प्रत्येक खेळाडूची वैयक्तिक जबाबदारी असेल.

राज्य संघामध्ये निवड झालेल्या खेळाडूला राष्ट्रीय स्पर्धा सहभाग बंधनकारक आहे. संयुक्तिक कारणाशिवाय अथवा योग्य वेळी पूर्वकल्पना न देता राष्ट्रीय स्पर्धेस अनुपस्थित राहून पर्यायाने राज्याच्या खेळाडूंवर अन्याय करणाऱ्या खेळाडूवर निलंबनाची आणि आर्थिक दंडात्मक कारवाई करण्याचा ठराव राज्य संघटनेनी पारित केला आहे.

**नव्या नियमांबद्दल रेफरींसाठी कार्यशाळा:** दिनांक 24 ऑगस्ट 2018 शुक्रवारी दुपारी 4 ते 8 वाजेपर्यंत आयजेएफच्या नव्या नियमांबद्दल कार्यशाळेचे आयोजन करण्यात आलेले आहे, यासाठी या स्पर्धेसाठी नियुक्त 25 रेफरींसह इतर मर्यादित रेफरींची सोय करण्यात येवू शकते. अहमदनगर येथे झालेल्या आणि बीड येथे होणाऱ्या अशा दोन्ही कार्यशाळेत जे-जे रेफरी उपस्थित राहतील त्यांनाच यापुढील राज्य स्पर्धेसाठी आमंत्रित केले जाईल, तसेच फेडरेशनतर्फे जेंव्हा रेफरींची विचारणा केली जाईल तेंव्हा कार्यशाळेत सहभागी झालेल्या रेफरीचेच नाव पाठवले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

कार्यशाळेसाठी सहभागी होवू इच्छिणारे रेफरी किमान 'ब्लॅक बेल्ट शोदान' असणे आवश्यक आहे. इच्छूकांची नावे सचिवांनी लेटरहेडवर लिहून सही शिक्यांनीशी सचिव, राज्य संघटना यांना ईमेलद्वारे **दिनांक 18 ऑगस्ट 2018 पर्यन्त पाठवावी**. या परिपत्रकासोबत कार्यशाळेत सहभागी होणाऱ्या रेफरींसाठी भरून देण्याचा नमूना अर्ज जोडला आहे. तो अर्ज पूर्ण माहितींनीशी आधार कार्डाच्या छायाप्रतीसह बीड येथे आणावा.

महाराष्ट्र ज्युदो संघटना कोणत्याही परिस्थितीत, कोणाचेही गैरवर्तन कदापिही सहन करणार नाही. स्पर्धा आणि निवास या ठिकाणी असभ्यपणा, मोठयाने आवाज करणे, मोबाईलवर इतरांना त्रास होईल असा त्याचा वापर करणे इत्यादी गैरवर्तन कोणीही करू नये. निवास, भोजन आणि खेळण्याचा परिसर येथे गैरवर्तन केल्याची माहिती कळवण्याची जबाबदारी सामायिक राहील. याचबरोबर मालमत्तेचे नुकसान कोणीही आणि कोणत्याही कारणाने केल्यास त्या संबंधित संघाकडून तो खर्च वसूल तर केलाच जाईल शिवाय संबंधितांवर कडक कारवाई केली जाईल. महाराष्ट्राच्या संघातील त्या जिल्ह्याचे स्थान जाणे अथवा जिल्ह्याचे निलंबनदेखील होवू शकते याची गंभीर नोंद घेऊन, आपल्या शिस्तप्रिय खेळाची परंपरा जबाबदारीने सर्वांनीच पुढे न्यावी ही सर्वांनाच आग्रहाची विनंती. यासाठी संघव्यवस्थापक आणि संघाबरोबरील प्रशिक्षकांना प्रत्येक जिल्ह्याच्या सचिव/अध्यक्षांनी जागरूक रहाण्याच्या सूचना द्याव्यात.

व्यवस्थापक-प्रशिक्षक नसलेल्या संघास निवासाची व्यवस्था करून दिली जाणार नाही.

मॅटवर येवून न खेळता वॉकओव्हर देणाऱ्या खेळाडूस / संघास दरवेळी रु 100/- दंड केला जाईल.

**13**) संघातील खेळाडूंच्या विम्याची जबाबदारी संबंधित जिल्ह्याची असेल. खेळाडूंना स्पर्धेच्या कालावधीमध्ये अथवा स्पर्धेकरिता येताना अथवा स्पर्धेहून आपल्या गावी परतताना कोणत्याही घटनेमुळे होणाऱ्या इजांची / दुर्घटनांची जबाबदारी संयोजक संघटना अथवा महाराष्ट्र ज्युदो संघटनेवर किंवा त्यांच्या पदाधिकाऱ्यांवर रहाणार नाही. मात्र स्पर्धेदरम्यान प्राथमिक उपचाराची सोय आयोजकांकडून स्पर्धा ठिकाणी करण्यात येईल. पुढील गंभीर उपचाराचा खर्च आणि सोय ज्या-त्या संघास करावी लागेल याची नोंद घ्यावी.

**14**) सभासद नसणाऱ्या जिल्हा संघटनेस स्पर्धेमधे सहभाग देण्या - न देण्याचा अधिकार महाराष्ट्र ज्युदो संघटनेकडे सुरक्षित असेल.

**15**) प्रत्येक जिल्ह्यातील खेळाडू हा त्या जिल्ह्यातील रहिवासी असायला हवा. अर्थात कोणताही खेळाडू स्वत:चा जिल्हा सोडून इतर जिल्ह्यातून खेळताना आढळल्यास त्यावर कारवाई होईल तसेच त्यास मदत करणाऱ्या संबंधित क्लब / जिल्ह्यावरही कारवाई होईल.

**16**) सर्व पत्रव्यवहार संघटनेच्या लेटरहेडवर प्राधिकृत व्यवस्थापक अथवा सचिव यांच्या स्वाक्षरीने व्हावा.

- ✓ आयजेएफच्या/जेएफआयच्या नव्या नियमांनुसार खेळाडूस प्रोत्साहन देताना (चियरिंग करताना) अथवा कोणत्याही प्रसंगी रेफरीच्या निर्णयावर आक्षेपार्ह प्रतिक्रिया देणे, रेफरीचे लक्ष विचलित करणे आदी घडल्यास कारवाई करण्यात येवू शकते.
- ✓ रेफरींचा निर्णय अंतिम असेल. रेफरीच्या निर्णयाबाबत आक्षेप असल्यास फक्त संघाच्या व्यवस्थापकांनी या संदर्भात मॅट चेअरमन / स्पर्धा संचालक यांच्याशी संपर्क साधावा.
- ✓ आक्षेपार्ह सामन्याचे रेकॉर्डिंग पहाताना राज्य संघटनेच्या अधिकृत कॅमेरामधीलच रेकॉर्डिंग पाहिले जाईल, वैयक्तिक मोबाइलचे रेकॉर्डिंग गृहीत धरले जाणार नाही.

महाराष्ट्र ज्युदो संघटनेच्या सर्व उपक्रम/कार्यक्रमाबाबत माहिती सर्वांना कायम उपलब्ध व्हावी यासाठी इंटरनेटवर **www.mahajudo.com** हे संकेतकेंद्र उपलब्ध असून इच्छुकांनी कृपया यावरून माहिती घ्यावी. अधिक माहितीसाठी श्री. दत्ता आफळे, जनरल सेक्रेटरी, महाराष्ट्र ज्युदो संघटना 9049998765/94231 50231 अथवा डॉ. गणेश शेटकर, सचिव, बीड जिल्हा ज्युदो संघटना, 87887 - 50223; 94222 - 40382 (ganeshshetkar99@gmail.com) यांच्याशी संपर्क साधावा.

कळावे,

आपला विश्वासू,

Maharashtra Judo Association T.R.No. F- 3967 Mumbai

दत्ता आफळे
जनरल सेक्रेटरी
महाराष्ट्र ज्युदो संघटना

**<u>वयगट</u> -Age Group-1**

| | 46 वी सबज्युनियर्स राज्य ज्युदो स्पर्धा आणि राष्ट्रीय निवड चाचणी स्पर्धा-2018-बीड<br>दिनांक 25-26-27 ऑगस्ट 2018 | | | |
|---|---|---|---|---|
| | **Name of District:** | | | |
| **Wt. Category** | **Full Name (Surname / Name/ Fathers' Name)** | **Date of Birth** | **Address** | **Aadhar Card Number** |
| BOYS -25Kg | | | | |
| BOYS -30Kg | | | | |
| BOYS -35Kg | | | | |
| BOYS -40Kg | | | | |
| BOYS -45Kg | | | | |
| BOYS +45Kg | | | | |
| GIRLS -24Kg | | | | |
| GIRLS -28Kg | | | | |
| GIRLS -32Kg | | | | |
| GIRLS -36Kg | | | | |
| GIRLS -40Kg | | | | |
| GIRLS +40Kg | | | | |
| Coach | | | | |
| In case of discrepancies on the document the undersigned / District Judo Assn is taking all the responsible for any action by the MJA | | | | |
| President & Secretary,<br>Signature & Stamp | | | | |

**वयगट** -Age Group-2

| | 46 वी सबज्युनियर्स राज्य ज्युदो स्पर्धा आणि राष्ट्रीय निवड चाचणी स्पर्धा-2018-बीड<br>दिनांक 25-26-27 ऑगस्ट 2018 | | | |
|---|---|---|---|---|
| | Name of District: | | | |
| **Wt. Category** | **Full Name (Surname / Name/ Fathers' Name)** | **Date of Birth** | **Address** | **Aadhar Card Number** |
| BOYS -30Kg | | | | |
| BOYS -35Kg | | | | |
| BOYS -40Kg | | | | |
| BOYS -45Kg | | | | |
| BOYS -50Kg | | | | |
| BOYS +50Kg | | | | |
| GIRLS -28Kg | | | | |
| GIRLS -32Kg | | | | |
| GIRLS -36Kg | | | | |
| GIRLS -40Kg | | | | |
| GIRLS -44Kg | | | | |
| GIRLS +44Kg | | | | |
| Manager | | | | |
| In case of discrepancies on the document the undersigned / District Judo Assn is taking all the responsible for any action by the MJA | | | | |
| President & Secretary,<br>Signature & Stamp | | | | |

**<u>वयगट</u> -Age Group-3**

**46 वी सबज्युनियर्स राज्य ज्युदो स्पर्धा आणि राष्ट्रीय निवड चाचणी स्पर्धा-2018-बीड**

**दिनांक 25-26-27 ऑगस्ट 2018**

**Name of District:**

| Wt. Category | Full Name (Surname / Name/ Fathers' Name) | Date of Birth | Address | Aadhar Card Number |
|---|---|---|---|---|
| BOYS -45Kg | | | | |
| BOYS -50Kg | | | | |
| BOYS -55Kg | | | | |
| BOYS -60Kg | | | | |
| BOYS -66Kg | | | | |
| BOYS +66Kg | | | | |
| GIRLS -40Kg | | | | |
| GIRLS -44Kg | | | | |
| GIRLS -48Kg | | | | |
| GIRLS -52Kg | | | | |
| GIRLS -57Kg | | | | |
| GIRLS +57Kg | | | | |
| Coach | | | | |

In case of discrepancies on the document the undersigned / District Judo Assn is taking all the responsible for any action by the MJA

President/Secretary,
Signature & Stamp

**46 वी सबज्युनियर्स राज्य ज्युदो स्पर्धा आणि राष्ट्रीय निवड चाचणी स्पर्धा-2018-बीड**

**दिनांक 25-26-27 ऑगस्ट 2018**

# पंचांची यादी

| | | | |
|---|---|---|---|
| 01 | संतोष बाबर | कोल्हापूर | स्पर्धा संचालक |
| 02 | माधव भट | नाशिक | मॅट चेअरमन |
| 03 | नीलेश शेळके | पुणे | मॅट चेअरमन |
| 04 | अशोक जंगमे | औरंगाबाद | मॅट चेअरमन |
| 05 | अतुल बामनोदकर | औरंगाबाद | टेक्निकल ऑफिशियल |
| 06 | कल्याणी शेटकर | औरंगाबाद | टेक्निकल ऑफिशियल |
| 07 | विकास पाटील | सातारा | टेक्निकल ऑफिशियल |
| 08 | सुधीर जमदाडे | सातारा | टेक्निकल ऑफिशियल |
| 09 | अतुल जाधव | सांगली | टेक्निकल ऑफिशियल |
| 10 | रितेश भगत | नागपूर | टेक्निकल ऑफिशियल |
| 11 | प्रकाश इजनकर | नागपूर | टेक्निकल ऑफिशियल |
| 12 | मनिंदर बिलवाल | औरंगाबाद | टेक्निकल ऑफिशियल |
| 13 | योगेश शिंदे | नाशिक | टेक्निकल ऑफिशियल |
| 14 | श्रेयस पोटले | नाशिक | टेक्निकल ऑफिशियल |
| 15 | निखिल सुवर्णा | ठाणे | टेक्निकल ऑफिशियल |
| 16 | आशुतोष लोकरे | ठाणे | टेक्निकल ऑफिशियल |
| 17 | सचिन देवळे | अमरावती | टेक्निकल ऑफिशियल |
| 18 | नरसिंग यादव | अमरावती | टेक्निकल ऑफिशियल |
| 19 | जयेंद्र साखरे | यवतमाळ | टेक्निकल ऑफिशियल |
| 20 | नीतू सिंग | मुंबई | टेक्निकल ऑफिशियल |
| 21 | मधुश्री देसाई | पुणे | टेक्निकल ऑफिशियल |
| 22 | विकास देसाई | पुणे | टेक्निकल ऑफिशियल |
| 23 | दयानंद धाडवे | पुणे | टेक्निकल ऑफिशियल |

**जिल्हा ज्युदो संघटनेचे लेटरहेड**

/ /2018

प्रति,
सचिव,
महाराष्ट्र ज्युदो संघटना
पुणे

विषय: रेफरी वर्कशॉप बीड- 2018

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून कळविण्यात येते की, आमच्या संघटनेतर्फे खालील रेफरी दिनांक 7 मार्च 2018 रोजी बीड येथे आयोजिलेल्या नव्या नियमांच्या वर्कशॉपसाठी येवू इच्छित आहेत. या सर्व रेफरींच्या नावाची यादी या पत्रासोबत जोडली आहेत. सर्व सहभागी होवू इच्छिणाऱ्या पंचांचे सही शिक्यांनीशी पूर्ण माहितीचे अर्ज आणि प्रवेश शुल्क रुपये 250/- प्रत्येकी बीड येथे आपणास देवू.
आपणास विनंती की, या सर्वांना बीड येथील वर्कशॉपमध्ये प्रवेश द्यावा.

कळावे,

आपला विश्वासू,

(नाव)
सचिव
मोबाईल क्रमांक-

# नव्या नियमांसंदर्भात रेफरी वर्कशॉप

**दिनांक 24 ऑगस्ट 2018, बीड**

## प्रवेश अर्ज

| पासपोर्ट साईझ 2 फोटो (एक येथे चिटकवावा) |
|---|

| | | | |
|---|---|---|---|
| संपूर्ण नाव (आडनाव प्रथम) | | | |
| जिल्हा ज्युदो संघटनेचे नाव | | | |
| पत्रव्यवहारासाठी निवासाचा पत्ता | | | |
| नोकरीच्या संस्थेचे नाव, नोकरीचे पद आणि कार्यालयाचा पत्ता | | | |
| जन्मतारीख | | | |
| आधार कार्ड क्रमांक (*) | | | |
| संपर्क क्रमांक (मोबाईल) (*) | | | |
| ईमेल आयडी (*) | | | |
| किती वर्षापासून ज्युदो खेळत आहे | | | |
| ब्लॅकबेल्ट उत्तीर्ण वर्ष - दान | वर्ष - | दान - | |
| NDIO उत्तीर्ण (असल्यास) वर्ष | होय / नाही | उत्तीर्ण वर्ष - | ग्रेड - A / B |
| इतर माहिती (विशेष असल्यास) | | | |

{(*) माहिती भरणे आवश्यक आहे}

वरील माहिती खरी असून मी महाराष्ट्र ज्युदो संघटनेनी आयोजिलेल्या ज्युदो-कार्यक्रमांना मला आमंत्रित केल्यास माझ्या उपस्थितीबाबत ताबडतोब सूचना देईन आणि सहकार्य करेन. आयजेएफ आणि जेएफआय द्वारा लागू झालेल्या ज्युदो संदर्भातील सर्व नियमांचे आणि शिस्तीचे मी पालन करेन.

तारीख: / 08/2018 स्वाक्षरी